महाराष्ट्र वन विभाग

☎ :०२२-२८६९२६६८/ २८६९२५९६

apccfwlmumbai@mahaforest.gov.in

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

वन्यजीव पश्चिम प्रदेश

मुंबई

जुनी एम.एच.बी. कॉलनी, एल.टी.रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## कंत्राटी तत्वावर पदे भरण्याकरीता जाहिरात

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांचे अधिनस्त विवक्षित कामाकरीता खालीलप्रमाणे नमुद पदे ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नेमणुक करण्याकरीता उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | पदांचे नाव | संख्या | मानधन (प्रति माह) |
|---|---|---|---|
| १) | मुख्य निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (कंत्राटी) | १ | ३५,०००/- |

### अर्ज सादर करण्याचा कालावधी

- दिनांक ०२/०७/२०२२ ते ०८/०७/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत खालील नमुद कार्यालयातील पत्त्यामधील E-mail id वर सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज सादर करणेचे आहेत. विहीत नमुन्यात अर्ज सादर न केल्यास अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
- अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अनुभवाबाबत योग्य त्या कागदपत्रांच्या स्वस्वाक्षांकित सत्यप्रती जोडाव्यात.
- विहीत मुदतीत प्राप्त अर्जाची छाननी करुन,मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची लघुयादी तयार करुन सदर उमेदवारांना या कार्यालयामार्फत तसे दुरध्वनी वरुन / Email द्वारे कळविण्यात येईल.
- मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांच्या मुलाखती खाली नमूद केलेल्या या कार्यालयाच्या पत्त्यावर घेण्यात येतील.
- लघुयादीमधील पात्र उमेदवारांना निश्चित केलेल्या दिनांकास मुलाखतीस उपस्थित राहणेची जबाबदारी पात्र उमेदवाराची राहील.
- नमूद वेळेत व दिनांकास उपस्थित न राहणाऱ्या उमेदवाराचा विचार निवड प्रक्रियेत केला जाणार नाही.
- मुलाखतीस बोलावल्यास त्यावेळी मुळ कागदपत्रे दाखववी लागतील.

## कार्यालयाचा पत्ता:-

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई

जुनी एम.एच.बी. कॉलनी, एल.टी.रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१

ई-मेल आयडी - apccfwlwest@gmail.com

वयोमर्यादा :-

२१ ते ३५ वर्षे (अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास)

अटी व शर्ती:-

१. वरील सर्व पदांसाठी संगणक ज्ञान व टायपिंग येणे आवश्यक राहील. (३० ते ४० / शब्द प्रति मिनीट)
२. वरील सर्व पदांसाठी मराठी व इंग्रजीतून पत्रव्यवहार करता येणे आवश्यक आहे.
३. निम्नस्वाक्षरीकर्ते यांनी प्रशासकीय अधिकार राखून ठेवले आहेत.
४. कंत्राटी अधिकारी यांना कंत्राटी तत्वावर महिना पूर्ण झालेवर वेतन अदा करणेत येईल.
५. वरील सर्व पदे आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त करणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी राखुन ठेवला आहे.
६. निवड करण्यात येणाऱ्या उमेदवारास / व्यक्तीस या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या विहीत नमुन्यात रु. १००/- चे स्टॅम्पपेपर वर बंधपत्र सादर करावे लागेल.
७. कंत्राटी अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे शासनास आर्थिक नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई कंत्राटी अधिकाऱ्याकडून वसुल करुन घेतली जाईल.
८. कंत्राटी अधिकाऱ्यांना सर्व प्रकारच्या शासकीय सुट्टया लागू राहणार नाहीत. २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर या शिवाय साप्ताहिक सुट्टी ०४ दिवस तसेच सदर कंत्राटी अधिकाऱ्यांकरिता सहा दिवसांचा कामाचा आठवडा राहील.
९. निम्नस्वाक्षरीकर्ता यांना कंत्राटी अधिकाऱ्याला ११ महिने पूर्ण होण्याच्या अगोदर कारण न देता व कोणतीही पूर्व नोटिस न देता कामावरुन काढून टाकणे व त्यांचे कंत्राट रद्द करणेचे अधिकार असतील.
१०. कंत्राटी अधिकाऱ्याला सुध्दा एक महिना अगोदर लिखित नोटीस देवून त्यांचे कंत्राट रद्द करण्याची मुभा आहे.
११. कंत्राटी अधिकाऱ्याचे बंधपत्र रद्द करेपर्यंतच्या दिवसाचे वेतन देणे निम्नस्वाक्षरीकर्ता यांना बंधनकारक असेल.
१२. कंत्राटी अधिकाऱ्याच्या अखत्यारित असलेले शासकीय दस्ताऐवज, नस्ती, पत्रव्यवहार याची गोपनीयता त्यांना पाळणे बंधनकारक आहे. तसेच सदर शासकीय माहितीचा दुरूपयोग केल्यास त्यास कंत्राटी कर्मचारी पूर्णपणे जबाबदार धरून प्रचलित नियम व कायदयानुसार कारवाई केली जाईल.
१३. कामाचे तास हे कार्यालयीन कामाच्या गरजेनुसार वेळोवेळी निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी ठरवून दिल्याप्रमाणे राहतील.
१४. अर्जदार गुन्हेगारी प्रवृत्तीचा किंवा पार्श्वभुमीचा नसावा. तसे आढळुन आल्यास सदर अर्जदारास तात्काळ कमी करणेत येईल.

१५.बंधपत्र संपलेनंतर कंत्राटी अधिकाऱ्याच्या अखत्यारीत दिलेले शासकीय दस्तऐवज, कागदपत्रे, पुस्तके व इतर साहित्य कार्यालयात जमा करावे व दस्ताऐवजाच्या कोणत्याही प्रती कोणत्याही प्रकारात सोबत नेऊ नये. तसे आढळल्यास नियमाने होणाऱ्या कारवाईस कंत्राटी कर्मचारी पात्र राहील.

१६.सदरची पदे ही महाराष्ट्र शासनाची निर्मीत पदे नाहीत. सदर पदावर निवड केल्यास कोणताही अनुभवाचा दाखला, पदावर हक्क अथवा निर्माण होणाऱ्या शासकीय पदावर हक्क सांगता येणार नाही.

टिपः- ही शासकीय नोकरी नसून केवळ कंत्राटी पद्धतीवर ११ महिन्यांच्या करारावर नियुक्ती आहे. शैक्षणिक अर्हता, अनुभव, कर्तव्य, जबाबदारी, मानधन, नियुक्ती, कालावधी, बंधपत्र, अर्जाचा नमुना, निवडीची पद्धत इ. सविस्तर तपशिल www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशिल पाहून अर्ज करावे. आवश्यक वाटल्यास या विभागाशी संपर्क साधावा.

२३/५/१७

प्रशासकीय अधिकारी
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) पश्चिम, मुंबई

## आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता:-

### मुख्य निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी (कंत्राटी)

अर्जदार विज्ञान शाखेचा मास्टर्स डिग्री धारक असावा, वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल.

## अनुभव

१) कोणत्याही निसर्ग माहिती केंद्र येथे, निसर्ग शिक्षण व विस्तार अधिकारी म्हणून१ ते २ वर्ष अनुभव असणे गरजेचे आहे.

२) राष्ट्रीय उद्यानाबद्दल व निसर्ग विषयक सखोल माहिती असावी.

## कर्तव्ये

१) निसर्ग माहिती केंद्र येथील विविध कार्यक्रमांची आखणी करणे तसेच त्यांची अंमलबजावणी करणे.

२) निसर्ग शिक्षण शिबीरांचे आयोजन करणे.

३) निसर्ग शिक्षणाच्या दृष्टीने सादरीकरण, डॉक्युमेंटरी बनविणे.

४) निसर्ग शिक्षणाच्या दृष्टीने Social Media Campaign करणे.

५) शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

६) शासनाच्या कामांसाठी दौरे करणे, प्रशिक्षण व फिल्ड सर्व्हे करणे.

७) विविध प्रसंगी छायाचित्रण, रेखांकन इत्यादी स्पर्धा आयोजित करणे.

८) इतिहास, संस्कृती, भुगर्भशास्त्र इत्यादी विषयांबाबत जनजागृती करणे.

९) राष्ट्रीय उद्यानांमध्ये प्रशिक्षणार्थींसाठी Internship Program चालवणे.

१०)अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम प्रदेश, मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या कार्यक्षेत्रामध्ये वेळोवेळी क्षेत्रीय दौरे करुन अहवाल सादर करणे.

ठिकाण: बोरीवली
दिनांक : ०१/०७/२०२२

प्रशासकीय अधिकारी
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) पश्चिम, मुंबई

# अर्जाचा नमुना

| |
|---|
| आयडेंटिटी साईज रंगीत फोटो |

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) पश्चिम, मुंबई

विषय :- ............................................................. या पदासाठी अर्ज.

संदर्भ :- .................................... दिनांक............................................... मधील जाहिरात.

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळातील तपशिलवार जाहिरात वाचली असून, माझा वैयक्तिक तपशीलखालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नांव :-

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-

३. संपूर्ण पत्ता व मोबाईल/संपर्कक्रमांक/ई मेल आय.डी. :-

४. शैक्षणिक पात्रता :-

५. अनुभव :-

अर्जदाराचे संपूर्ण नाव, सही व पत्ता

ठिकाण :-
दिनांक :-